23 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महामानव' महाकाव्यग्रंथाचे प्रकाशन

टेंबलाईवाडी ता. २२ : ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील २०२१ कवितांचा समावेश असलेला महाकाव्यग्रंथ कृतज्ञतेने ओथंबलेला आहे,'' असे भावोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. तरोडा-खुर्द (जि. नांदेड) येथील प्रा. अशोककुमार दवणे संपादित 'महामानव' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयीच्या महाकाव्यग्रंथाचे महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांत एकाचवेळी प्रकाशन झाले. येथील प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठात झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, ''महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाकाव्यग्रंथ' हा उपक्रम एकमेवाद्वितीय स्वरुपाचा असून, त्यासाठी प्रा. दवणे यांचे कार्य अभिनंदनीय आहे. राज्यभरातून आलेल्या पाच हजारांहून अधिक कवितांमधून निवडक २०२१ कवितांचे संकलन व संपादन, ही मोठी कामगिरी आहे. तीन पिढ्यांतील कवींच्या कविता यात आहेत. त्याचप्रमाणे या संग्रहामध्ये शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील साठहून अधिक कवींच्या कवितांचा समावेश असणे, ही बाबही महत्त्वाची आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, नामदेवराव कांबळे, प्रा. जेलीत कांबळे, प्रा. प्रेरणा व्यवहारे, डी. एस. कौशल कांबळे, डॉ. मधुकर धुतूरे, गौतम वर्धन, संजय कुर्डूकर, पी. डी. सरदेसाई, प्रमोद जवळगेकर उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत केले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी आभार मानले.

सकाळ

# अभ्यासक्रम शुल्क वाढवू नये; व्यवस्थापन परिषद

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी कोणत्याही अभ्यासक्रमाचे शुल्क वाढवू नये, असा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. आज (२२) विद्यापीठात बैठक झाली.

कोरोनामुळे दीड वर्षापासून सर्व महाविद्यालय बंद होती. दोन दिवसांपूर्वी महाविद्यालय सुरू केली आहेत. या पार्श्वभूमीवर आज विद्यापीठात व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. कोरोनामुळे सर्वसामान्य कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटली आहे. शैक्षणिक खर्च हा या कुटुंबांसाठी महत्त्वाचा आणि मोठा खर्च आहे. शैक्षणिक खर्चाचा भार विद्यार्थ्यांवर पडू नये, यासाठी आज व्यवस्थापन परिषदेने महत्त्वाचा निर्णय घेतला. पुढील वर्षभर सर्वच महाविद्यालयांनी कोणत्याही अभ्यासक्रमाचे शुल्क वाढवू नये, असे बैठकीत ठरले. ज्या विद्यार्थ्यांनी राज्यसेवा आयोगाची पूर्वपरीक्षा उत्तीर्ण केली आहे त्यांना मुख्य परीक्षा व मुलाखत याची तयारी करण्यासाठी सर्व साधने आणि सुविधा विद्यापीठ पुरवणार आहे. या सर्व सेवा सुविधा विनाशुल्क असतील. विद्यापीठाचा ॲथलिट रोहन कांबळे याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला आर्थिक मदत करण्याचा निर्णयदेखील परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

बैठकीला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

23 OCT 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशस्वी होण्यासाठी ध्येयवेडे होण्याची गरज

## कुलगुरू डॉ. शिर्के : वडणगे येथे विविध पुरस्कारप्राप्त भूमिपुत्रांचा गौरव



वडणगे : वडणगे (ता. करवीर) येथील सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने प्राचार्य डॉ. महादेव नरके, अजित पाटील, अरुण पाटील, रघुनाथ पाटील या भूमिपुत्रांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मान्यवर.

**वडणगे : पुढारी वृत्तसेवा**

क्षेत्र कोणतेही असो, वलय निर्माण करण्याची ताकद स्वतःकडे असेल तर कोणाची ओळख लागत नाही. त्यासाठी ध्येयवेडे होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वडणगे (ता. करवीर) येथील सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने पार्वती मंदिराच्या प्रांगणात भूमिपुत्रांनी विविध क्षेत्रांत मिळवलेल्या पुरस्कारानिमित्त त्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब पाटील होते.

तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सर्वपक्षीय कृती समिती व शिवपार्वती झाडवाट कुरण मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके यांना राज्यस्तरीय महाराष्ट्राचा कोरोना योद्धा पुरस्कार, अजित पाटील यांना रोटरीचा कोरोना योद्धा पुरस्कार, रघुनाथ पाटील यांना रोटरीचा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, निर्माण कन्स्ट्रक्शनचे अरुण पाटील यांना कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा राज्यांचा बांधकाम अभियंता गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, गुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य नरके, 'निर्माण'चे अरुण पाटील, मुन्वर मुल्ला, इंद्रजित पाटील, डॉ. सुनील पाटील, सरपंच सचिन चौगले, जि. प. माजी सदस्य बी. एच. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ. विलास पोवार, उपसरपंच सयाजी घोरपडे, विविध संस्थांचे पदाधिकारी, सर्वपक्षीय कृती समिती सदस्य यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. स्वागत व परिचय डॉ. विलास पोवार यांनी, प्रास्ताविक राजू पोवार यांनी, सूत्रसंचालन आर. बी. देवणे यांनी केले. आभार सुनील परीट यांनी मानले.

2 3 OCT 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रामाणिकपणे कष्ट केल्यास यश निश्चित

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : वडणगे पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्षेत्र कोणतेही असो, वलय निर्माण करण्याची ताकद स्वतःकडे असेल तर कोणाची ओळख लागत नाही. प्रामाणिकपणे कष्ट केल्यास निश्चितच यश पाठीमागून येते. त्यासाठी प्रत्येक तरुणाने ध्येयवेडे होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

वडणगे (ता. करवीर) येथील सर्वपक्षीय कृती समितीतर्फे पार्वती मंदिराच्या प्रांगणात आयोजित भूमिपुत्रांनी विविध क्षेत्रात मिळवलेल्या पुरस्कारानिमित्त त्यांच्या सत्कार



वडणगे : येथील सर्वपक्षीय कृती समितीतर्फे प्राचार्य डॉ. महादेव नरके, अजित पाटील, अरुण पाटील, रघुनाथ पाटील या भूमिपुत्रांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : पांडुरंग पाटील)

सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब पाटील होते. कुलगुरू शिर्के यांचा सत्कार सर्वपक्षीय कृती समिती व शिवपार्वती झाडवाट करण मंडळ यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला.

डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके यांना राज्यस्तरीय महाराष्ट्राचा कोरोना योद्धा पुरस्कार, अजित पाटील यांना रोटरीचा कोरोना योद्धा पुरस्कार, रघुनाथ पाटील यांना रोटरीचा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, निर्माण कन्स्ट्रक्शनचे अरुण पाटील यांना कर्नाटक-महाराष्ट्र-गोवा राज्यांचा बांधकाम अभियंता गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुन्वर मुल्ला, इंद्रजित पाटील, डॉ. सुनील पाटील, सरपंच सचिन चौगले, बी. एच. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. विलास पोवार, उपसरपंच सयाजी घोरपडे, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि सर्व पक्षीय समिती सदस्य आदी उपस्थित होते. स्वागत डॉ. विलास पोवार यांनी, प्रास्ताविक राजू पोवार यांनी केले.

23 OCT 2021
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चरचे कार्य दिशादर्शक'

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. २२ : ''शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चरचे कार्य शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक आहे,'' असे कौतुकोद्‌गार महाराष्ट्राच्या रेशीम संचालनालयाचे प्रादेशिक संचालक महेंद्र ढवळे यांनी काढले.

जिल्ह्यातील रेशीम शेती, गडहिंग्लज येथील अंडीपुंज निर्मिती केंद्र, शिवाजी विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स इन सेरिकल्चर आदी उपक्रमांची पाहणी आणि शेतकऱ्यांच्या गाठीभेटी, चर्चेसाठी ढवळे जिल्हा भेटीवर आले होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत सदिच्छा भेट झाली.

ढवळे म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाच्या रेशीमविषयक केंद्राने शेतकऱ्यांना शैक्षणिक, तसेच प्रात्यक्षिके दाखवून मार्गदर्शन केले आहे. या माध्यमातून उद्‌बोधन, प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे कार्य या केंद्राने आणि केंद्राचे संचालक डॉ. ए. डी. जाधव यांनी केले.''

डॉ. शिर्के यांच्या हस्ते मलबेरी रोप देऊन ढवळे यांचे स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. जाधव, जिल्हा रेशीम अधिकारी भगवान खंडागळे, गडहिंग्लज रेशीम कार्यालयाचे अनिल संकपाळ आदी उपस्थित होते.

23 OCT 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची परीक्षा शुल्कवाढ स्थगित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने सन २०२०-२०२१ वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांची परीक्षा शुल्कवाढ स्थगित केली. त्यामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील अडीच लाख विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

दरवर्षी ऑक्टोबरमध्ये मूळ परीक्षा शुल्कावर पाच टक्के शुल्कवाढ करण्यात येते. मात्र, कोरोनामुळे पालकांची आर्थिक स्थिती बिकट आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अधिकार मंडळांनी परीक्षा शुल्कवाढ वर्षासाठी स्थगित केली. गेल्यावर्षी देखील शुल्कवाढ केली नव्हती, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. दरम्यान, यापूर्वी विद्यापीठाने अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला होता.

## व्यवस्थापन परिषदेतील अन्य विषय

- विद्यापीठाची विविध प्रकाशने मराठी आणि इंग्रजी भाषेत अनुवाद करण्याच्या मराठी विभागाच्या प्रकल्पाला मान्यता
- दूरशिक्षण केंद्राला बळकटी देण्यासाठी तेथे आवश्यक कर्मचारी नियुक्तीला मान्यता
- एमपीएससीच्या पूर्व परीक्षेतील टॉप ५० विद्यार्थ्यांना विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे मार्गदर्शन केले जाणार
- ॲथलेटिक्सपटू रोहन कांबळे याला आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत

23 OCT 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदानच्या सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कन्सॉर्शियम ऑफ एज्युकेशनल कम्युनिकेशन (सीईसी) हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) आंतरविद्यापीठ केंद्रांपैकी एक प्रमुख व्यासपीठ आहे. दूरदर्शनचे प्रभावी माध्यम, अलीकडील काळात माहिती तंत्रज्ञानाची उपलब्ध नवसाधने व मंच या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उच्च शैक्षणिक गरजांची पूर्तता करण्यासाठी ते विकसित केले आहे. 'सीईसी' या उपक्रमांतर्गत विविध ऑनलाईन शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठाच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

> कोविडने प्रत्यक्ष शिक्षणासह ऑनलाईन शैक्षणिक साधने, उपक्रमांचीही गरज पटवून दिली आहे. त्यामुळे 'सीईसी'च्या व्यासपीठावरील अत्यंत उपयुक्त व प्रभावी स्टडी मटेरियल विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देताना आनंद होत आहे.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या उपक्रमाचे ऑनलाईन लोकार्पण झाले. या सुविधांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले. 'सीईसी'ने तयार केलेल्या पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांसाठीचे स्टडी मटेरियल, ई-कन्टेन्टचा विद्यार्थ्यांना लाभ व्हावा, यासाठी शिवाजी विद्यापीठाने त्यांच्यासमवेत सामंजस्य करार केला. याअंतर्गत 'सीईसी'चे स्टडी मटेरियल पदवी स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यात आले. मॉड्यूलमध्ये चार विभाग आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात लिखित स्वरुपातील संसाधने, दुसऱ्या विभागात ऑडिओ - व्हिज्युअल स्वरुपातील व्याख्याने, तिसऱ्या विभागात संदर्भ साधने, तर चौथ्या विभागात स्वयं-मूल्यांकनासाठी प्रश्नावली व स्वाध्याय समाविष्ट आहेत. ७४० पेपरची व्याख्याने याअंतर्गत उपलब्ध आहेत. बी. एस्सी., बी. ए. आणि बी. कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी ती उपयुक्त ठरणार आहेत.

तरुण भारत

# एमपीएससी पूर्वपरीक्षा उत्तीर्ण ५० विद्यार्थ्यांचा खर्च करणार

## शिवाजी विद्यापीठच्या बैठकीत निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ५० विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ स्वखर्चाने पुढील शिक्षण देणार आहे. हा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्यां व्यवस्थापन परिषदेत घेण्यात आला. ही बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत विविध निर्णय घेण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये



प्रवेश शुल्कात वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला.तसेच कोरोना कालावधीमध्ये शासन नियमानुसार प्रवेश शुल्कात सूट देण्यात येणार आहे. प्राध्यापकांसह विविध पदांच्या जाहिरात काढण्यास मान्यता देण्यात आली. यांसह विविध विषयांवर चर्चा होऊन त्यास मान्यता देण्यात आली आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.

लोकमत

# कोल्हापुरात रंगणार 'तलवारबाजी' स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात दि. २३ (शनिवार) पासून ३२ वी वरिष्ठ गट राज्यस्तरीय तलवारबाजी (फेन्सिंग) अजिंक्यपद स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी नऊ वाजता शाहू छत्रपती यांच्या हस्ते, तर पालकमंत्री आणि महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सोमवार (दि. २५) पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील ४५० खेळाडू सहभागी झाले आहेत. त्यांच्यातून अखिल भारतीय स्पर्धेसाठी राज्य संघ निवडण्यात येणार आहे.

कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशन, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठातर्फे इपी, फॉईल, सेंबर या प्रकारात स्पर्धा होईल.